# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१८/०९/२०१८

## दि.१७/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६४२/१८,भादविक ३९२,३४१,३२३,५०४,५०६(२) |
| **फिर्यादी** | पांडुरंग ओव्हाळे,वय-६७ वर्ष,रा.गाडीतळ येरवडा,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०९/२०१८ रोजी १५/४५ वा. बालाजी सुगंधालय नावाचे दुकान,नगर रोड येरवडा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे लघुशंका करून त्यांचे मालकीचे दुकान बालाजी सुगंधालय नगर रोडवर आले असताना,सदर ठिकाणी नमुद इसमाने फिर्यादीस अडवुन,त्यांना लोखंडी पालघनचा धाक दाखवुन त्यांचे खिशातील १,५००/- रुपये काढुन घेतले. त्यावेळी फिर्यादी यांनी आरडा-ओरडा केला असता,त्यांची मुलगी निता ही भांडणे सोडविणेसाठी व सदर इसमास समजाविण्यासाठी आली असताना,तीचे केस ओढून तीस व फिर्यादीस हाताने मारहाण केली आहे. तसेच तुम्ही माझे ऐकले नाही तर तुमचे दुकान जाळुन टाकीन अशी धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सुशिल बोबडे ९८२३०७९५९३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४६२/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | अजय बोरुडे,वय-३४ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०१८ रोजी दु.१२/०० ते १४/१५ वा.चे दरम्यान डिंबळे बिल्डींग,मराठा सोसायटी, धनकवडी, पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,हॉल मधील टि-पॉयवर ठेवलेले रोख व सोन्याचे दागिने असा एकुण हॉलमध्ये टी-पॉयवर ठेवलेली रोख रक्कम व बेडरुममधील लाकडी कपाटातील ड्रॉवर मधील ५,०९,०००/- रूपये रोख रक्कम व सोन्याची कर्णफुले असा एकुण ५,१५,२५०/- रूपये किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.ए.गायकवाड ९८२३७११७१८ |

१

## दि.१८/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २४३/१८,भादविक ३७९,माहिती तंत्र.का.क.६६(क) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८,रा.ता.शिरगांव,जि.रत्नागिरी |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०१८ रोजी २१/०० वा. तुळशीबाग गणपती परिसर गणपती दर्शन घेत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पती व मुलासमवेत गणपतीचे देखावे पाहत असताना,कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे लेडीज पर्सचे छोटी पर्स मधील रोख रक्कम ५ हजार रूपये व एटीएम कार्ड,वैयक्तिक माहिती असलेली डायरी चोरून,डायरीतील एटीएम पीन व एटीएम कार्डाचा वापर करून,फिर्यादी यांचे बँक खात्यातील एटीएम कार्डाव्दार ४७ हजार रूपये काढुन असा सर्व मिळुन एकुण ५२,०००/- रूपये काढले. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) ए.जी.मराठे ७३५०००२३११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**